पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
कार्यपत्रिका क्र. ९
सभावृत्तांत

दिनांक :- ०५/१२/२०१८ वेळ :- दुपारी १२.:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०५/१२/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२ मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३ मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४ मा.संगिता राजेंद्र भोंडवे
५ मा.नामदेव जनार्दन ढाके
६ मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७ मा.सुरेश शिवाजी भोईर
८ मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
९ मा.राजेंद्र तानाजी गावडे
१० मा.निता विलास पाडाळे
११ मा.संतोष अंकुश कोकणे
१२ मा.उषा दिलीप काळे
१३ मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य
१४ मा.विठ्ठल भोईर , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.पंढरीनाथ गुंडाळ – प्र.प्रशासन अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय, मा.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.आर.एम.इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.सुनिल अहिरे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक, ब क्षेत्रीय कार्यालय, श्री.किशोर ढगे, अतिक्रमण निरिक्षक, अतिक्रमण मुख्य कार्यालय, श्री.आढळे, उदयान निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ८, दिनांक १६/११/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे प्रकट केले.

त्यानंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केल्याप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक ३ ब प्रभागातील अतिक्रमण विभाग मुख्य कार्यालयात वर्ग झालेला आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे हे काम प्रभाग क्रमांक १७ मधील राडारोडा उचलणेसाठी वापर करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ३७ विषय क्र. १

दिनांक ०५/१२/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे अनुमोदक: मा.नामदेव जनार्दन ढाके

संदर्भ :-मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा यांचा दिनांक १०/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

आदर्शनगर किवळे येथे ३० वर्षापासून रहिवाशी असलेले व नेहमी समाजसेवेसाठी तत्पर असणारे सुनिल गणपत शिवणकर यांचे दिनांक १८/८/२०१८ रोजी आकस्मिक निधन झाले आहे येथील सर्व मंडळीच्या सकारात्मक विचाराने त्यांच्या स्मरणार्थ आदर्शनगर किवळे शेवटचा बस थांबा चौकाला कै.सुनिल गणपत शिवणकर यांचे नांव देण्याकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता, सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येत आहे असे ठरले.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३८ विषय क्र. २

दिनांक ०५/१२/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.निता विलास पाडाळे अनुमोदक: मा.उषा दिलीप काळे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक २६/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

तापकिर मळा चौक ते संत श्री सावता महाराज मंदिर पिंपरीगाव या रस्त्याला संत शिरोमणी श्री सावता महाराज असे नांव देण्यात यावे. तरी सदर संबंधीत प्रभागातील नागरीकांच्या भावना लक्षात घेऊन सदर रस्त्यास संत शिरोमणी श्री सावता महाराज असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३९ विषय क्र. ३

दिनांक ०५/१२/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर अनुमोदक: मा.करुणा शेखर चिंचवडे

संदर्भ :- मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा दिनांक ०५/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव .

ब प्रभागातील अतिक्रमण विभाग मुख्य कार्यालयात वर्ग झालेला आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे हे काम प्रभाग क्रमांक १७ मधील राडारोडा उचलणेसाठी वापर करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.करुणा शेखर चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/२०८/२०१८.
दिनांक : 39 / 12 /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना